# कोठी-कोरणार पूल प्रकरण दडपण्याचा प्रयत्न

## जिल्हाधिकारी कार्यालयावर विविध संघटनांचा मोर्चा

**लोकसत्ता वार्ताहर**



**गडचिरोली :** कोठीझ्कोरणार पूल प्रकरणी जबाबदार अधिकारी व कंत्राटदारांवर तातडीने कारवाई करावी, या मागणीसाठी आजाद समाज पार्टीच्या वतीने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर घेराव आंदोलन करण्यात आले. आंदोलनाला मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, आदिवासी विकास युवा परिषद आणि बिरसा ब्रिगेडने पाठिंबा दिला. यावेळी जिल्हाभरातून आलेल्या कार्यकर्ते व नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

पूल कोसळून २० दिवस उलटले, तरी संबंधित अधिकाऱ्यांवर ठोस कारवाई झालेली नाही, यावर आंदोलकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. ज्या पुलाचे उद्घाटन मुख्यमंत्री करतात, त्याच पुलाच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्न निर्माण झाल्यानंतरही कारवाई का होत नाही, असा सवाल आंदोलकांनी केला. पालकमंत्री राजीनामा द्या', 'अधीक्षक अभियंत्यांना निलंबित करा', 'भ्रष्टाचार करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा', अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. अधीक्षक अभियंत्यांना निलंबित करावे, संबंधित कंत्राटदाराविरुद्ध गुन्हा दाखल करून परवाना रद्द करावा, तसेच त्यांच्या कार्यकाळातील सुमारे ५५० कोटी रुपयांच्या कामांची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी करण्याची मागणीही आंदोलकांनी केली.

पूल दुर्घटनेनंतर केवळ कागदी अहवाल करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होऊ देणार नाही. जनतेच्या पैशांचा हिशोब द्यावाच लागेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. आंदोलकांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रकरणाबाबत भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी वरिष्ठ प्रशासनाशी चर्चा करून अहवाल सादर केला जाईल, असे सांगितले. आंदोलनाचे नेतृत्व प्रदेश सचिव धर्मानंद मेश्राम, जिल्हा प्रभारी विनोद मडावी, हंसराज उराडे, विवेक खोब्रागडे, अमोल मारकवार, कुणाल कोवे आणि गणेश वरखडे यांनी केले. दोषींवर कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

# १५ दिवसांच्या बाळासह मातेची तलावात उडी घेऊन आत्महत्या

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**अमरावती :** बाळंतपणासाठी माहेरी आलेल्या एका विवाहित मातेने आपल्या अवघ्या १५ दिवसांच्या चिमुरड्यासह तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना अंबाडा (ता. मोर्शी) येथे उघडकीस आली आहे. पूजा प्रवीण डाहे (२५) असे मृत विवाहितेचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दर्यापूर तालुक्यातील सांगवा येथील प्रवीण डाहे यांच्याशी पूजा यांचा विवाह झाला होता. त्या बाळंतपणासाठी अंबाडा येथील वडील शंकरराव नांदणे यांच्या घरी आल्या होत्या. सुमारे १५ दिवसांपूर्वी त्यांनी एका मुलाला जन्म दिला होता.

बुधवारी पहाटे तीनच्या सुमारास पूजा डाहे या आपल्या १५ दिवसांच्या बाळाला घेऊन घरातून निघून गेल्या. पहाटेच्या सुमारास मुलगी व बाळ दोघेही घरात न दिसल्याने कुटुंबीयांनी शोध सुरू केला. दरम्यान, गावाजवळील त्रिवेणी तलावात पूजा यांचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. स्थानिक मच्छीमारांच्या मदतीने त्यांचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर तब्बल सहा तासांच्या शोधकार्यानंतर चिमुकल्याचा मृतदेहही हाती लागला.

### मानसिक अस्वास्थ्यातून टोकाचे पाऊल?

प्रसूतीनंतर पूजा गेल्या काही दिवसांपासून सतत अस्वस्थ होत्या आणि विनाकारण बडबड करत होत्या, अशी माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली आहे. घटनेची माहिती मिळताच मोर्शी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मोर्शी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले असून, पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास मोर्शी पोलीस करत आहेत.

# रिक्त पदे योजना अंमलबजावणीत अडसर

**अकोला :** अनुसूचित जाती प्रवर्गातील नागरिकांसाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचवणे आवश्यक असून, योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करण्यावर भर द्यावा, असे निर्देश महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीने आज येथे दिले. त्याचप्रमाणे, रिक्त पदांची भरती तातडीने करण्याच्या सूचनाही समितीने दिल्या आहेत.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीच्या सदस्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. समितीचे सदस्य आ. जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.अशोक माने, संजय मेश्राम, गजानन लवटे उपस्थित होते.

**VJTI MUMBAI**
**वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था**
Veermata Jijabai Technological Institute
(Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
H. R. Mahajani Road, Matunga (East), Mumbai - 400 019
Phone: +91 22 24198101/102 Fax: +91 22 24102874 www.vjti.ac.in

**निविदा सूचना**

"नोकर आणि सफाई कामगारांच्या निवासस्थानांची संरचनात्मक दुरुस्ती व नूतनीकरण" ज्याचा अंदाजित खर्च १,३४,३३,५८१ रुपये आहे. या कामासाठी संबंधित अनुभव असलेल्या कंत्राटदारांकडून/संस्थांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा दस्तऐवज आणि संबंधित माहिती www.vjti.ac.in आणि https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

निविदा सादर करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आहे.

Sd/-
प्रबंधक

**असेट्स केअर & रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राईज लि.**
नोंदणीकृत कार्यालय: चौदावा मजला, एरॉस कॉर्पोरेट टॉवर, नेहरू प्लेस, नवी दिल्ली -110019. टेली.: 91-11-43115600 फॅक्स: 91-11-43115618
कॉर्पोरेट कार्यालय: ऑफिस क्र 101, कल्पतरू इन्फिनिया, प्लॉट बी, ग्रँड हयात हॉटेलजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-400051, महाराष्ट्र. टेली.: 022 68643101.
ई-मेल: acre.arc@acreindia.in वेबसाईट: www.acreindia.in CIN: U65999DL2002PLC115769

**जोडपत्र IV-ए - अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) व नियम 9(1) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकार व जामीनदार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की **असेट्स केअर & रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राईज लि. [CIN: U65993DL2002PLC115769] ("सुरक्षित धनको")** कडे तारण / भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांचा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून त्यांची पुढील कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांचेकडून घेणे असलेल्या थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी सदर मालमत्तेची **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे"** तत्त्वावर विक्री करण्यात येईल. प्रत्येक मालमत्तेसाठी आरक्षित किंमत व बयाणा रक्कम नमूद करण्यात आलेली आहे.

**अनामत मत्तेचे तपशील**

| अ. क्र. 1 | कर्ज खाते क्र. आणि एसीआरई ट्रस्टचे नाव | कर्जदार / सह-कर्जदार/ गहाणकार / जामीनदाराचे नाव | 2-जून-26 रोजी एकूण थकबाकी अधिक भरणा आणि वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू व्याज, शुल्के व खर्च | आरक्षित किंमत | बयाणा रक्कम | बयाणा रकमेच्या डिमांड ड्राफ्ट/ आरटीजीएस/ एनईएफटी च्या माध्यमातून भरण्यासाठी बँक खात्याचे तपशील | लिलाव दिनांक आणि वेळ | बयाणा रक्कम जमा करण्याचा दिनांक आणि वेळ | पीडीएफ पाहण्यासाठी बारकोड स्कॅन करा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **AFH0028005 33075 ACRE 166 TRUST** | **अभय अरुणराव घिमे (कर्जदार), नीता अभय घिमे (सह-कर्जदार)** | **रु. 54,58,766/-** (रुपये चौपन्न लक्ष अठ्ठावन्न हजार सातशे सहासष्ट फक्त) | रु. 13,80,000/- (रुपये तेरा लक्ष ऐंशी हजार फक्त) | रु. 1,38,000/- (रुपये एक लक्ष अडतीस हजार फक्त) | खाते क्रमांक: ACRE-166-TRUST खाते क्रमांक: 0901102000042112 बँक: आयडीबीआय बँक IFSC: IBKL0000901 | **22 सप्टेंबर 2026 रोजी दु. 2.30 ते 3.30 वाजेपर्यंत** | **21 सप्टेंबर 2026 रोजी 4:00 वाजेपर्यंत** | |

**अनामत मत्तेचे वर्णन** : बाब क्र. 1 - खास मौजा सुकळी (बु.), प.ह.न. 77, ग्राम पंचायत सुकळी, तह. हिंगणा, जि. नागपूर, खसरा क्र. 11, म्हणजे प्लॉट क्र. 18, यत नाथ डेव्हलपर्स यांनी बांधलेले बिगरशेती लेआउट, लांबी 15 मीटर उत्तर ते दक्षिण आणि रुंदी 10 मीटर पूर्व ते पश्चिम, एकूण क्षेत्रफळ सुमारे 150 चौ.मी. (1614 चौ.फू.), **चतुःसीमा:** पूर्वेस - प्लॉट क्र. 17, पश्चिमेस - प्लॉट क्र. 19, उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट क्र. 4. बाब क्र. 2 - प्लॉट क्र. 19, खास मौजा सुकळी (बु.), प.ह.न. 77, ग्राम पंचायत सुकळी, तह. हिंगणा, जि. नागपूर, खसरा क्र. 11, यत नाथ डेव्हलपर्स यांनी बांधलेले बिगरशेती लेआउट, लांबी 15 मीटर उत्तर ते दक्षिण आणि रुंदी 10 मीटर पूर्व ते पश्चिम, एकूण क्षेत्रफळ सुमारे 150 चौ.मी. (1614 चौ.फू.), **चतुःसीमा:** पूर्वेस - प्लॉट क्र. 18, पश्चिमेस - प्लॉट क्र. 20, उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट क्र. 3.

**लिलाव प्रक्रियेबाबत महत्त्वाची माहिती**

| | | |
|---|---|---|
| 1. | बयाणा रकमेचा भरणा वर नमूद करण्यात आलेल्या बँक खात्यामध्ये डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटी च्या माध्यमातून करण्यात यावा. | |
| 2. | लिलावासाठी वेबसाईट | www.bankeauctions.com |
| 3. | संपर्क तपशील | 1800-209-2989 / auction.support@acreindia.in / rohan.sawant@acreindia.in |
| 4. | मालमत्तेची पाहणी केवळ आधी वेळ घेऊनच करता येईल. | |
| 5. | विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया वेबसाईटला भेट द्यावी www.acreindia.in / www.bankeauctions.com | |

**दिनांक: 20.08.2026**
**स्थान: नागपूर**

स्वा/- प्राधिकृत अधिकारी,
असेट्स केअर & रिकंस्ट्रक्शन एन्टरप्राईज लि.

## अवयवदानातून तीन जणांना जीवनदान

**अमरावती :** रस्ते अपघातात गंभीर जखमी झालेल्या तरुणाला डॉक्टरांनी 'ब्रेन डेड' घोषित केले. या दुःखद प्रसंगातही कुटुंबीयांनी धैर्य दाखवत अवयवदानाचा निर्णय घेतला आणि त्यामुळे तीन रुग्णांना नवजीवन मिळाले. या घटनेमुळे अवयवदानाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. चांदूर रेल्वेच्या या तरुणाचे मूत्रपिंड आणि यकृत इतरांसाठी जीवनदान देणारे ठरले आहे.

चांदूर रेल्वे येथे राहणारा धीरज संतोष कलावते (३१) याच्या कारचा गेल्या १२ ऑगस्टला शेंदूरजना खुर्द ते चांदूर रेल्वेमार्गावर अपघात झाला होता. अमरावतीच्या 'रीम्स' रुग्णालयात तीन दिवस उपचार करण्यात आले. १५ ऑगस्टला त्याला रेडियंट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. येथे उपचारादरम्यान १८ ऑगस्ट रोजी धीरज याला 'ब्रेन डेड' घोषित करण्यात आले. यावेळी डॉक्टरांनी कुटुंबीयांना अवयवदानाची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली. कलावते कुटुंबीयांनी सकारात्मक प्रतिसाद देत अवयवदानास संमती दिली. त्यांच्या एका निर्णयामुळे तीन गरजू रुग्णांना नवजीवनाची आशा मिळाली आहे.

दरम्यान, बुधवारी सकाळी अवयव संकलनाची प्रक्रिया पार पडली. या अवयवदानातून एक यकृत आणि दोन मूत्रपिंडे गरजू रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात आली. यकृतासाठी न्यू इरा हॉस्पिटल नागपूर, एका मूत्रपिंडासाठी किम्स किंग्जवे हॉस्पिटल नागपूर आणि दुसऱ्या मूत्रपिंडासाठी रीम्स हॉस्पिटल, अमरावती येथील तज्ज्ञ पथकाने अवयव संकलनाची प्रक्रिया पूर्ण केली. या संपूर्ण प्रक्रियेत डॉ. राहुल सक्सेना, डॉ. अशय सूर्यवंशी, डॉ. शुभम चव्हाण, डॉ. हितेश गुल्हाने, न्यूरोलॉजिस्ट डॉ. सिकंदर अडवाणी, न्यूरोसर्जन डॉ. आनंद काकाणी तसेच रेडियंट सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉक्टर, नर्सिंग, टेक्निकल आणि प्रशासकीय चमूने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. रेडियंट हॉस्पिटलमध्ये आतापर्यंत पाच रुग्णांनी अवयवदान केले आहे.

## बेपत्ता वृद्धाचा तलाव परिसरात मृतदेह

**चंद्रपूर :** चार दिवसांपासून बेपत्ता असलेल्या ६५ वर्षीय वृद्धाचा मृतदेह चिंधिमाल गावाजवळील तलाव परिसरात आढळून आल्याने नागभीड वनपरिक्षेत्रात खळबळ उडाली आहे. वाघाच्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात येत असून, या घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मोरेश्वर गोपिचंद सावसाकडे (६५, रा. तुकुम, तिवर्ला) हे १६ ऑगस्ट रोजी शेताकडे गेले होते. मात्र, रात्री उशिरापर्यंत ते घरी परतले नाहीत. त्यानंतर कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी त्यांचा शोध सुरू केला. घटनेची माहिती वनविभाग तसेच पोलिसांना देण्यात आली. मागील चार दिवसांपासून वनविभाग आणि पोलिसांकडून शोधमोहीम राबवण्यात येत होती.

# चिखलदरा 'स्कायवॉक' पर्यटकांसाठी खुला होण्याची प्रतीक्षा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**अमरावती :** चिखलदरा या विदर्भातील एकमेव थंड हवेच्या ठिकाणी भारतातील सर्वाधिक लांबीचा काचेचा पूल (स्काय वॉक) उभारण्यात येत आहे. सुमारे ४०७ मीटर लांबीच्या या पुलाचे काम सुरू झाल्यानंतर अडथळ्यांची शर्यत पार करावी लागली. आता या स्कायवॉकचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. या पुलाला मध्यभागी आधार द्यावा लागणार आहे. स्कायवॉक पर्यटकांसाठी खुला होण्याची प्रतीक्षा आहे.

चिखलदरा येथील हरिकेन पॉईंट ते गोराघाट पॉईंटला जोडणाऱ्या या प्रकल्पाला २०१८ मध्ये राज्य सरकारने परवानगी दिली होती. यासाठी सुमारे ४० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. दोन मोठ्या टेकड्यांना स्कायवॉकने जोडण्यात येईल. या स्कायवॉकचा ५० ते ७० मीटरचा भाग काचेचा राहणार आहे, त्यामुळे पर्यटकांकरिता एक नवे आकर्षण निर्माण होईल.

स्कायवॉक पर्यटकांसाठी खुला करण्यापूर्वी वनसंरक्षण अधिनियम (एफसीए) आणि वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत आवश्यक असलेल्या दोन अंतिम परवानग्या मिळणे बाकी आहे. यासाठी प्राथमिक मंजुरी मिळाली असून अंतिम मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे. स्कायवॉकची लांबी जास्त असल्याने मध्यभागी आधार द्यावा लागणार आहे. यासाठी वनविभागाची परवानगी घेण्यात आली आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने सुरुवातीच्या सहा महिन्यांच्या चाचणी कालावधीत काच बसवण्यात येणार नाही. त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात 'स्टील ग्रेटिंग शीट' बसवून स्कायवॉकची कार्यक्षमता तपासली जाणार आहे. या दरम्यान सुरक्षिततेची चाचणी घेण्यात येईल.

स्कायवॉकची उंची २८० मीटर (अंदाचे ५९४ फूट) आहे. या स्कायवॉकचे फ्लोअर १२ मिलीमीटर जाडीच्या त्रिस्तरीय काचेचे असणार आहे. एकाचवेळी ५०० पर्यटकांचा भार सांभाळण्याची तसेच प्रतितास १९० किलोमीटर गतीचा वारा झेलण्याची क्षमता या काचेची राहणार आहे. हरिकेन आणि गोराघाट यादरम्यान सर्वसाधारण वाऱ्याचा वेग ताशी १६० किलोमीटर असतो. या प्रकल्पावर सुमारे ४० कोटी रुपये खर्च होत आहेत.

### व्यवस्थापनाचे आव्हान

स्कायवॉक प्रकल्पामुळे चिखलदरा येथे पर्यटकांची गर्दी वाढून पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल, असे सांगितले जात असले, तरी गर्दीचे नियंत्रण, व्यवस्थापन करणे हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान असणार आहे. प्लास्टिकच्या कचऱ्याची मोठी समस्या भेडसावत असताना स्कायवॉक परिसरात तो रोखण्याचे प्रयत्न करावे लागणार आहेत.

**आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**
Aadhar Housing Finance Ltd
**कॉर्पोरेट कार्यालय:** ऑफिस क्र. 501 आणि 503, पाचवा मजला, लाइटब्रिज, साकी विहार रोड, अंधेरी पूर्व, मुंबई उपनगर (जिल्हा), महाराष्ट्र - 400072
**पुसद शाखा:** 201, दुसरा मजला, प्लॉट क्र. 51, साई गोविंदा कॉम्प्लेक्स, वसंत नाईक चौक, पुसद, यवतमाळ जिल्हा- 445204-महा
**यवतमाळ शाखा:** पहिला मजला, मेगाटीया लेआउट, प्लॉट क्र. 39, नझुल शीट क्र. 17, भूखंड क्र. 90/2, आर्णी नाका, यवतमाळ - 445001 (महाराष्ट्र)
**भंडारा शाखा:** दुसरा मजला, हनुमान वॉर्ड, कॅनरा बँकेच्या वर, बस स्टँड जवळ, मेन रोड, भंडारा - 441904 (महा)

**जोडपत्र IV ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (AHFL)** चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद कर्जदारांना / जामीनदारांना एक मागणी सूचना निर्गमित केली ज्यात त्यांना सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत सूचनेत नमूद रकमेची परतफेड करण्याचे आव्हान करण्यात आले होते. कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार/जामीनदारांना व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेन्ट रुल्स, 2002 च्या नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13 च्या उप-विभाग (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13 च्या उप-विभाग (8) मधील तरतुदींकडे वेधण्यात येते. याद्वारे कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सावधगिरीची सूचना देण्यात येते की सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो एएचएफएलच्या खाली नमूद रकमेच्या व त्यावरील व्याज एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल.

| अ. क्र. | कर्जदार/सह-कर्जदाराचे नाव (शाखेचे नाव) | अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता) | मागणी सूचना दिनांक व रक्कम | ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | (कर्ज कोड क्र. 33910000296 / पुसद शाखा आणि 14000000376 / यवतमाळ शाखा) रमेश मूलचंद रुणवाल (कर्जदार) चंदा रमेश रुणवाल (सह-कर्जदार) | प्लॉट क्र. 10 अ, मौजा पुसद, नगर परिषद पुसद च्या स्थानिक हद्दीत, ता. पुसद, जि. यवतमाळ. शीट क्र. 19 नझुल प्लॉट क्र. 6056 प्लॉट क्र. 10अ, क्षेत्रफळ सुमारे 63.9 चौ.मी., मु. पुसद, त. पुसद, जि. यवतमाळ - 445204. **चतुःसीमा: पूर्वेस - लेआउट प्लॉट क्र. 9, पश्चिमेस - नारायण महिंद्रे यांच्या प्लॉट क्र. 10 ब चा उर्वरित भाग, उत्तरेस - लेआउट रस्ता, दक्षिणेस - येरावार लेआउट.** | **12-05-2026 Rs. 14,89,197/-** | 18-08-2026 |
| 2 | (कर्ज कोड क्र. 33910000049/पुसद शाखा) उमेश देवानंद जाधव (कर्जदार) उज्वला देवानंद जाधव (सह-कर्जदार) | प्लॉट क्र. 48, मौजा दिग्रस, नगर परिषद दिग्रस च्या स्थानिक हद्दीत, ता. दिग्रस, जि. यवतमाळ, शेत सर्वे क्र. 150/1, लेआउट प्लॉट क्र. 48, प्लॉटचे क्षेत्रफळ सुमारे 90.75 चौ.मी. म्हणजे 977 चौ.फू., दिग्रस, ता. दिग्रस, जि. यवतमाळ - 445203. **चतुःसीमा: पूर्वेस - लेआउट रस्ता, पश्चिमेस - लेआउट प्लॉट क्र. 44, उत्तरेस - लेआउट प्लॉट क्र. 47, दक्षिणेस - लेआउट प्लॉट क्र. 49.** | **12-05-2026 Rs. 5,43,165/-** | 18-08-2026 |
| 3 | (कर्ज कोड क्र. 33910000191/पुसद शाखा) हर्ष संजय वाघमोडे (कर्जदार) आशा संजय वाघमोडे (सह-कर्जदार) | प्लॉट क्र. 150 चा भाग, मौजा पुसद, नगर परिषद पुसद च्या स्थानिक हद्दीत, शेत नझुल शीट क्र. 43, नझुल प्लॉट क्र. 150 चा भाग क्षेत्रफळ सुमारे 37.17 आणि क्षेत्रफळ सुमारे 29.73 चौ.मी. म्हणजे एकूण क्षेत्रफळ सुमारे 66.9 चौ.मी., पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ-445204. **चतुःसीमा: पूर्वेस-रस्ता, पश्चिमेस-शिंदे आणि देशमुख यांचे घर, उत्तरेस-गल्ली, दक्षिणेस-किरण दुपर्ते यांचे घर.** | **12-05-2026 Rs. 16,01,383/-** | 18-08-2026 |
| 4 | (कर्ज कोड क्र. 30310000147/भंडारा शाखा) सिद्दीक याकुब कुरेशी (कर्जदार) फर्जाना याकुब कुरेशी (सह-कर्जदार) | घर / मालमत्ता क्र. 133 (कर मूल्यांकन नुसार), एकूण क्षेत्रफळ सुमारे 138 चौ.मी. (म्हणजे 1485 चौ.फू.) त्यावरील बांधकामासह, मौजा-नाकाडोंगरी, प्रभाग क्र.01, नर्सिंग ग्राऊंड जवळ, नाकाडोंगरी रोड, ग्रामपंचायत क्षेत्रात, तह. तुमसर आणि जिल्हा भंडारा, महाराष्ट्र-441907. **चतुःसीमा: पूर्वेस- मोकळी जमीन, पश्चिमेस-रस्ता, उत्तरेस- चितरंजन शेंडे यांचे घर, दक्षिणेस- कलीम कुरेशी यांचे घर.** | **09-06-2026 Rs. 10,55,356/-** | 18-08-2026 |

**स्थान: महाराष्ट्र**
**दिनांक: 20-08-2026**

स्वा/- प्राधिकृत अधिकारी
आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड करिता

